## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०६/२०१७

### १) शाळेतील परीसरात खुल्या जागेतील मोटार पंप व केबल वायरची चोरी. :—

दिनांक ०९/०६/२०१७ चे ०५.३० वा. ते १०/०६/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी मुख्याधापक यांनी शाळेतील परिसरात खुल्या जागेतील विहीरीवर लावलेली १ जुनी किर्लोसकर कंपनीची १ एचपी मोटार पंप व १०० फुट केबल वायर एकुण किंमती ५,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी किशोर ईस्तारी वंजारी वय ५० वर्ष, रा. विश्राम गृह समोर विनोबा नगर तुमसर याचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

### २) गैरकायदयाची मंडळी जमवुन शिवीगाळ व जिवाने मारण्याची धमकी देवुन मृतकचे आत्महत्तेस प्रवुत्त केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०४/०६/२०१७ ते १८.३० वा. दरम्यान यातील मृतक राजेश निवृत्ती गाढवे वय ३२ वर्ष, रा. अकोला याने आपले स्वत:चे घराचे स्वयंपाक खोलीतील स्लॅपचे हुकाला नॉयलॉन दोरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने पो.स्टे आंधळगाव मर्ग क्र. ११/१७ कमल १७४ जाफौ. दाखल करण्यात आला असुन सदर मर्गची चौकशी दरम्यान आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मृतकास शिवीगाळ करुन तसेच जिवाने मारण्याची धमकी देवुन कृती व्दारे मृतकाला मरण्यास अपप्रेरणा देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने मर्ग चे चौकशी अहवाल व मृतकचे शव विच्छेदन अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनि. म्हैसकर पो. स्टे आंधळगाव यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे आंधळगाव येथे कलम ३०६,१४३,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. उईके पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

### ३) टाटा सुमो चारचाकी वाहनांच्या निष्काळजीपणामुळे पायी इसमास धडक मारुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०९/०६/२०१७ ते २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी लोकेश गोंधाळे वय ३२ वर्ष, रा. जेवनाळा याचा जखमी ताराचंद चैतरामजी गोधोळे वय ५२ वर्ष, मेंगापुर हे पालांदुर चौकातुन घरी पायी जात असतांनी यातील आरोपी वाहन हयगयीने व लापरवहीने भरधाव वेगाने चालवुन जखमीस धडक मारुन गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे पालांदुर येथे कलम २७९,३३८ भांदवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो. स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

### ४) नदीचे पाण्यात अचानक तोल जावुन इसमाचा मृत्यु :—

दिनांक ०९/०६/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील मृतक भारत शामराव सांगोडकर वय ४० वर्ष, रा. पाटनकर हा दिवान घाट नदीपात्राचे काठावर पायऱ्यावर बसला असता व मृतक हा पायाने अपंग असल्याने त्याचा अचानक तोल जावुन वैनगंगा नदीचे पाण्यात पडुन बुडुन मरण पावल्याने फिर्यादी पुरुषोत्तम चिंतामन सांगोडकर वय ४७ वर्ष, रा. मंगळवारी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) विज पडुन इसमाचा जागीच मृत्यु :—**

दिनांक १०/०६/२०१७ चे १५.३० वा. दर. यातील मृतक दत्तु पंढरी पडोळे वय ३५ वर्ष, रा. गुडेगाव हा गावावरुन वैनगंगा नदीचे पात्रातुन असलेल्या रस्त्याने गावाचे काही लोकांसोबत मांगली येथील आठवडी बाजारातुन भाजीपाला आनण्या करीता जात असतांना अचानक हवा तुफान व पाऊस येवुन मृतकावर आकाशातुन विज पडुन जागीच मरण पावल्याने फिर्यादी पंढरी शिवराम पडोळे वय ६२ वर्ष, रा. गुडेगाव पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**६) आजाराला कंटाळुन महिलेचा विहीरीचे पाण्यात बुडुन मृत्यु :—**

दिनांक १०/०६/२०१७ चे ०४.०० वा. दर. यातील मृतक सौ. मिना अनिल वरखडे वय ३२ वर्ष, जितेन्द्र झिंगर टेकाम वय ३२ वर्ष, रा. नर्सिगटोला ही २ महीण्या पासुन आजारी असुन तिचा औषधोपचार मेडीकल कॉलेज नागपुर येथे सुरु होता दि ०२/०६/२०१७ ला मेडीकल कॉलेज नागपुर येथुन डिस्चार्ज झाली व आपल्या पती सोबत घरी राहत होती मृतक हीने आजाराला कंटाळुन विहीरीचे पाण्यात कुदुन बुडुन आत्महत्या केल्याने फिर्यादी जितेन्द्र झिंगर टेकाम वय ३२ वर्ष, रा. नर्सिगटोला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो. स्टे करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**९) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक १०/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, करडी, गोबरवाही, साकोली व पालांदुर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १८८ लिटर हातभट्टी दारु किंमती १८,०००/—रु. १२ लिटर १५० मिली देशी दारू किंमती ३,३७५/—रु. असा एकुण किंमती २१,३७५/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १०/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०९ तीन सिटर वाहनांवरती १९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १११ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.